लोकसत्ता [पुणे]

२ WWW.LOKSATTA.COM
मंगळवार, १४ मे २०१९

# पथनाट्यातून सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती




प्रतिनिधी, पुणे

**आजच्या डिजिटल** युगात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती पथनाट्याच्या माध्यमातून देण्यात येत असून त्यातून जनजागृतीही केली जात आहे.

पुणे शहर पोलीस, 'पंख' संस्था आणि क्विकहील फाउंडेशनतर्फे जनजागृतीपर पथनाट्य सादरीकरणाचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या पथनाटय उपक्रमाचे उद्घाटन पोलीस आयुक्त के. व्यंकटेशम यांच्या हस्ते करण्यात आले. उपायुक्त स्वप्ना गोरे, सहा. पोलीस आयुक्त कल्याणराव विधाते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे या वेळी उपस्थित होते.

पोलीस यंत्रणेतर्फे नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'भरोसा सेल' आणि 'सायबर सेल' या विषयी पथनाट्यांमधून जनजागृती करण्यात येणार आहे. दांडेकर पूल वसाहत, केळेवाडी, जुना बाजार, पाटील इस्टेट, ताडीवाला रस्ता, वडारवाडी आदी ३० वस्त्यांमध्ये ही पथनाट्यं सादर करण्यात येणार आहेत. सायबर गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन पंख सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष स्मिता आपटे आणि क्विकहील फाउंडेशनचे अध्यक्ष कैलास काटकर यांनी या उपक्रमाचे संयोजन केले आहे.

पथनाट्याचे दिग्दर्शन कुलदीप दगडे यांनी केले आहे. संकल्प महाबळेश्वरकर यांनी लेखन केले असून पंख संस्थेचे समुपदेशक सचिन करंजुले आणि मृणाल मापुस्कर यांनी पथनाट्याचे संयोजन केले आहे. शहर पोलिसांच्या सेवा ॲप, बडी कॉप, पोलीस काका, दामिनी या उपक्रमांबाबत जनजागृती व्हावी यासाठी पंख संस्था व क्विकहील फाउंडेशन यापुढेही पथनाट्याचा उपक्रम करणार असल्याचे सांगण्यात आले.